
दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १६४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.७ सप्टेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com





# कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना टोल माफ

## गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधांचा घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्व आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली असून कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांना पथकरातून सवलत देण्यात येत असल्याची घोषणा सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. या पथकर सवलतीसाठी गणेशभक्तांच्या वाहनांना स्टीकर्स तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत.



आगामी गणेशोत्सव कालावधीत कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) शंभुराज देसाई, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार, अपर पोलीस महासंचालक (महामार्ग वाहतूक) डॉ. भूषणकुमार उपाध्याय, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव श्री. देबडवार आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून कोकणात जाणारे सर्व रस्ते, महामार्ग सुस्थितीत असणे गरजेचे आहेत. भाविकांचा प्रवास सुलभ व्हावा यासाठी पनवेल, पेण, महाड रस्ता, सातारा, भुईज, शेंद्रे तसेच कराड-पाटण चिपळूणमार्गे कोकणात जाणारा महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग, वाकण-पाली-खोपोली मार्ग, सिंधुदुर्गातील वागदे-कुडाळ मार्ग, आंबेनळी घाट, ताम्हिणी घाट, रत्नागिरी-सावर्डे रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची उर्वरित कामे दोन दिवसांत युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देशही मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिले. दरवर्षीप्रमाणे यंदाही कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना पथकरात सवलत देण्याची घोषणा करतानाच या वाहनांसाठी स्टीकर्स तातडीने उपलब्ध करुन देण्याचे निर्देशही यावेळी श्री. शिंदे यांनी दिले. मुंबई-पुणे, पुणे-सातारा, मुंबई-गोवा या महामार्गावरील पथकर नाक्यांवर अधिकचे मनुष्यबळ नेमणूक करुन गणेशभक्तांच्या वाहनांसाठी स्वतंत्र मार्गिका ठेवल्यास वाहतूक कोंडी कमी होईल.सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी समन्वयाने पथकर नाक्यांवर भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

पथकर नाक्यांवर गणेशभक्तांशी वाद घालू नका, पथकर सवलतीचे स्टीकर्स उपलब्ध करुन देण्याबरोबर पथकर नाक्यांवर रुग्णवाहिका, जलद प्रतिसाद वाहने, जेसीबीबरोबरच पुरेसे पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करा. कोविडचे संकट पाहता भाविकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचनाही श्री. शिंदे यांनी यावेळी दिल्या.

# लॅपटॉप चोरी करणारे राजस्थान मधील दोघे गजाआड

**दै.रायगड नगरी । संजय कदम**



**पनवेल** : नवी मुंबई, मुंबई शहर, ठाणे व नवी दिल्ली या शहरामधील क्रोमा , विजय सेल्स, रिलायन्स डिजीटल , किंग्ज इलेक्ट्रॉनिक अशा शोरूममधुन डिस्प्ले करिता ठेवलेल्या लॅपटॉपची चोरी करणाऱ्या राजस्थान येथील दोन गुन्हेगारास नवी मुंबई गुन्हे शाखा, कक्ष २ पनवेल यांनी अटक करून त्यांच्याकडुन एकुण १२,१०,३३७ / - रू किंमतीचे ०८ लॅपटॉप व गुन्ह्यात वापरलेली अल्टो कार हस्तगत केली. या आरोपींकडून आणखी सात लॅपटॉप चोरीचे गुन्हे उघडकीस करण्यात आले.

अटक आरोपींची नावे धर्मसिंह चौथीलाल मिना, वय-३८ वर्षे, आशिषकुमार रामहरी मिना, वय -२६ वर्षे, नवी मुंबई, मुंबई शहर व ठाणे पोलीस आयुक्तालयामध्ये असलेल्या क्रोमा, रिलायन्स डिजीटल, विजय सेल्स, किंग्ज ईलेक्टॉनिक अशा शोरूम मधुन डेमो साठी ठेवलेल्या लॅपटॉपची चोरी होण्याचे प्रकार घडले होते. अशाचप्रकारे एकाच दिवशी १७ ऑगस्ट २०२१ रोजी नवी मुंबई आयुक्तालयातुन काही तासाच्या अंतरामध्ये पनवेल शहरातील विजय सेल्स् व सीबीडी बेलापुर येथील क्रोमा इलेक्टॉनिक्स या शोरूममधुन डेमोसाठी ठेवलेले ०३ लॅपटॉप चोरी झाल्याबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे व सीबीडी बेलापुर पोलीस ठाणे येथे गुन्हे नोंद झाले होते. तसेच दिनांक १६ ऑगस्ट २०२१ रोजी या एकाच दिवशी बोरीवली पोलीस ठाणे मुंबईच्या हद्दीमध्ये वेगवेगळ्या अशा ०३ शोरूमधुन ०३ लॅपटॉप व चितळसर मानपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर हद्दीतुन ०१ लॅपटॉप चोरी झाल्याबाबत असे एकुण ०४ गुन्हे नोंद झाले होते. तसेच नवी दिल्ली येथील निर्माण विहार येथुन ०१ लॅपटॉप चोरी झाल्याबाबतचा गुन्हा नोंद आहे असे एकुण ०७ लॅपटॉप चोरीचे गुन्हे दाखल झाले होते.

पोलीस आयुक्त बिपिनकुमार सिंह, सह पो-लीस आयुक्त जय जाधव, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्रीमती रूपाली अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), विनोद चव्हाण, यांनी सदरचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत पोलीस ठाणे व गुन्हे शाखेस आदेशीत केले होते. सदर गुन्ह्यांचा समांतर तपास नवी मुंबई गुन्हे शाखा, कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक मानसिंग पाटील व पथक करीत असताना नमुद ०६ गुन्हे हे एकाच पध्द-तीने केले असल्याचे दिसुन आले. त्यामुळे नमुद सर्व गुन्ह्यांच्या घटनास्थळावरील व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व इतर तांत्रिक बाबींचा तपास केला असता नमुदचे गुन्हे हे एकाच आरोपीतांनी केले असल्याचे निष्पन्न झाले. हे आरोपी राजस्थान येथील असल्याचे तपासात निष्पन्न झाले. नमुदचे आरोपी हे राजस्थान येथुन मोटार कारने मुंबई, ठाणे, नवी मुंबई, नवी दिल्ली या शहरात जावुन तेथे असलेल्या वेगवेगळ्या इलेक्टॉनिक शॉपमध्ये ग्राहक म्हणुन लॅपटॉप खरेदीसाठी जात. शोरूमध्ये डिसप्लेसाठी ठेवण्यात आलेल्या लॅपटॉप .../२

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासकामांचा झंझावात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विधानसभा क्षेत्रात भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यामातून अनेक विकासाची करण्यात येत आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक आमदार विकास निधीमधून पाले बुद्रुक येथील पालेश्वरी मंदीर ते लक्ष्मण उलवेकर यांच्या घरा पर्यत्तच्या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम पुर्ण झाले आहे. तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून जिल्हा वार्षिक योजनेतून वाकडी ते दुंदरे या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. त्यानुसार या रस्त्याच्या पहिल्या टप्प्याचे काम पुर्ण झाले आहे. या विकासकामांचे उदघाटन आज (दि. ०६) करण्यात आले.

या रस्त्याच्या उद्घाटनावेळी भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजपनेते एकनाथ देशेकर, .../२



## संक्षिप्त...

### १४ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार, सात जणांना अटक

**दै.रायगड नगरी । पुणे**

पुण्यात रेल्वे स्थानक परिसरातून एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करून रेल्वेतील दोन कर्मचारी तसेच रिक्षा चालकांनी तिच्यावर सामूहिक बलात्कार केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. पोलीसांनी आठ आरोपींना अटक केली आहे.

याप्रकरणी पुण्यातील वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत १४ वर्षीय पिडीत मुलीने तक्रार दिली आहे. ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत हा प्रकार घडला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीत मुलगी ३१ ऑगस्ट रोजी गावी जाण्यासाठी पुणे रेल्वे स्थानक परिसरात आली होती.

रात्री तिला आरोपींनी आता गाडी नाही. गावी कशी जाणार असे म्हणत आम्ही तुझी राहण्याची व्यवस्था करतो, असे सांगून बाहेर आणले. तिचे अपहरण करून तिला वानवडी परिसरात नेले. त्या ठिकाणी आरोपींनी रात्री तिच्यावर बलात्कार केला. तसेच, दुसऱ्या दिवशी देखील तिच्यावर बलात्कार करण्यात आला. एकूण सात आरोपींनी तिच्यावर बलात्कार केला. दरम्यान, त्यांना सहाय्य करणाऱ्यांचा देखील पोलीस शोध घेत आहेत.

# राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वहाळ येथे विकास कामांचा धडाका

## लोकार्पण सोहळ्याला शेकाप जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील यांची प्रमुख उपस्थिती



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वहाळ ग्रामपंचायत हद्दीमध्ये विविध विकास कामांचे लोकार्पण करण्यात आले. या लोकार्पण सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा चिटणीस, रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष ऍड आस्वाद पाटील उपस्थित होते. यावेळी वहाळ ग्रामपंचायत करत असलेल्या कार्याची आस्वाद पाटील यांनी प्रशंसा केली.

वहाळ ग्रामपंचायतीच्या वतीने १४ व्या वित्तआयोग अंतर्गत सक्शन वाहन आणि घंटागाडी घेण्यात आल्या आहेत. या दोन वाहनांचे लोकार्पण आस्वाद पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच या वेळी एका खाजगी कंपनीच्या सी एस आर फंडातून वहाळ येथील बस स्टॉप वर पिण्याच्या पाण्याची पाणपोई आणि गझापो अर्थात अल्प विश्रांती ठिकाण कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यांचे लोकार्पण देखील आस्वाद पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

आस्वाद पाटील यांनी वहाळ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुरू असलेल्या कोरोनाविषाणू प्रतिरोधक लसीकरण उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. या लोकार्पण सोहळ्या बाबत माहिती देताना राजेंद्र पाटील म्हणाले की उलवे नोड मध्ये पन्नास हजाराहून अधिक लोक वस्ती झाली आहे. त्यामुळे सांडपाणी व्यवस्थापन सक्षम राहण्यासाठी आम्ही सक्शन वाहन खरेदी .../२

यासंगी कोरोना कालखंडामध्ये कोरोनाविषाणू लागण झाल्याने मृत पावलेल्या व्यक्तींवर अंत्यसंस्कार करणाऱ्या कबीर घरत आणि सचिन गायकवाड यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच नवनियुक्त ग्रामविकास अधिकारी नंदकिशोर भगत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

# पेण खोपोली मार्गावर मोकाट गुरांचा ठिय्या ; वाहन चालकांत संताप

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

**पेण** : पेण खोपोली मार्गावर सध्या मोकाट गुरांचा प्रश्न गंभीर बनला आहे. भर रस्त्यात ही गुरे ठिय्या मारून बसत असल्याने त्यातून वाट काढताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकदा वाहनांची धडक लागल्याने गंभीर जखमी होत गुरांना प्राण गमवावे लागत असल्याच्या घटना घडत आहे. दुसरीकडे रात्रीच्या वेळी रस्त्यात बसलेल्या गुरांचा अंदाज न आल्याने वाहन अपघातांचे प्रमाण वाढत आहे.

पेण खोपोली या मार्गावर ठिय्या मांडून बसणारी व रास्ता रोको करणारी गुरे ही प्रवाशी, वाहनचालक व नागरिकांसमोर डोकेदुखी ठरत आहे. हा मार्ग वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. या मार्गावरुन सातत्याने वाहनांची वर्दळ सुरु असते. रस्त्यातील जिवघेण्या खड्ड्यांमुळे हा मार्ग नेहमीच चर्चेत राहिला आहे. अशातच या मार्गावर मोकाट गुरांचा वावर वाढला असल्याने



वाहनचालकांसह प्रवासी देखील हैराण झाले आहेत.

मोकाट गुरे दिवसा व रात्री या मार्गाच्या मधोमध ठाण मांडत असल्याने जिवघेण्या अपघाती घटनांना निमंत्रण मिळत आहे. या मार्गावर रस्त्यात बसलेल्या गुरांना धडकून अनेकदा अपघाती घटना घडल्या आहेत. त्यामुळे गुरे मालकांनी आपापली गुरे .../२

# विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केली विसर्जन घाटांची पाहणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी गणेशोत्सव निमित्ताने वडाळे तलावाच्या विसर्जन घाटांची पाहणी केली. यावेळी पालिका अधिकाऱ्यांना कोविडच्या अनुषंगाने त्यांनी सूचना केल्या. यावेळी नगरसेविका डॉ सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज म्हात्रे, माजी नगरसेवक डीपी म्हात्रे, प्रकाश घरत, नरेश मुंढे, गणेश म्हात्रे, जॉनी जॉर्ज, अविनाश मकास, मंगेश अपराज, मंगेश भोईर, रोहन गावंड, सुरज बहाडकर, वैभव जोशी यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

गणपती विसर्जन निमित्त दरवर्षी घाई घाईत कामे उरकली जातात. मात्र यावर्षी व्यवस्थितीरित्या गणेश विसर्जन ठिकाणी सर्व व्हायला हवे असे प्रितम म्हात्रे यांनी या पाहणी दरम्यान सांगितले. तलावाची सध्याची परिस्थिती पाहता दोन ते तीन ठिकाणाहून इन्ट्री आहे. यावेळी विसर्जनासाठी एकाच ठकाणाहून इन्ट्री ठेवण्यात येणार आहे. बाकीच्या इन्ट्री बंद करण्यास सांगितल्या आहेत. त्यामुळे भाविकांमध्ये संभ्रम राहणार नाही. विसर्जनाच्या वेळेस महापालिकेच्या अधिकाऱ्यांची आरटीपीआर टेस्ट करून अँटीजेन टेस्ट करून ठेवायला हवे. विसर्जनासोबत भाविकांनी एका गणपती सोबत चार जण ठेवायला हवेत. जर जास्त नागरिक आलेच तर यासाठी पालिकेला आरोग्य सुविधा तैनात ठेवण्यास सांगितल्या आहेत. याठिकाणी दोन बॅनर लावा जेणेकरून विसर्जनाच्या वेळेस किती जण आले आहेत याची माहिती मिळेल. पनवेल महापालिकेच्या ६४ ठिकाणी गणपती विसर्जन घाट आहेत. भाविकांनी मास्क, सोशल डिस्टन्स याचे पालन करावे. जास्त गर्दी करता कामा नये. हे सगळे नियम ६४ ठिकाणी हेच नियम लागू पडतात असे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले आहे.

कोळी वाड्यावर मोठ्या प्रमाणात गणपती विसर्जन होते. .../२

### अॅड.मनोज भुजबळ यांच्या उत्कर्ष कला व क्रिडा मंडळाचा सामाजिक उपक्रम

# गोरगरीब व गरजूंना कोरोना लसीचे दोन मोफत डोस




**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपला आणि आपल्या कुटुंबातील सदस्याचा दुसरा डोस घ्यायचा बाकी आहे ना मग वेळ न दडवता आपण नवीन पनवेलच्या पोदी शाळेत या अन् आपला दुसरा डोस मोफत पण घ्या असा सामाजिक आणि आपुलकी जपणारा संदेश नवीन पनवेल मधील उत्कर्ष कला व क्रीडा मंडळाच्या अध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ यांनी राबविल्याने त्यांचे सर्वत्र खूप अभिनंदन व आभार मानले जात आहेत. समाजातील गोरगरीब व गरजूंना कोरोना लसीचे दोन मोफत डोस त्यांच्या मंडळाकडून उपलब्ध करून दिल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करुन धन्यवाद दिले आहेत. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जोपासणारे नवीन पनवेल मधील उत्कर्ष कला व क्रीडा मंडळ गेले अनेक वर्षापासून कार्यरत आहे .समाजातील गोरगरीब पददलित नागरिकांना विविध उपक्रमातून सहाय्य करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम नवीन पनवेल मधील उत्कर्ष कला व क्रीडा मंडळ करीत आहे. मंडळाचे सर्वेसर्वा अॅड. मनोज भुजबळ हे या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करीत आहेत. कोरोना काळ हा महाभयंकर काळ समाजाच्या नशिबी आला. या काळात सर्वच नागरिकांना लसीचे दोन डोस घेणे आर्थिक दृष्ट्या परवडत नसल्याने त्यांनी उत्कर्ष कला क्रीडा मंडळाकडून मोफत लसीचे दोन डोस देण्याचा स्तुत्य उपक्रम राबाविला आहे. या उपक्रमाला समाजातूनही चांगला उत्स्फूर्त प्रतिसादही मिळाला ८४ दिवसांपूर्वी त्यांनी सुरू केलेल्या या उपक्रमा नंतर ८४ दिवसांनंतरही दुसरा डोस घेण्यासाठी आपुलकीने त्यांच्या मंडळाच्या कार्यालयातून आज सकाळपासून मोबाईल फोन खणखणला व आपला पहिला डोस होऊन आता दुसरा डोस घेण्याची वेळ आली आहे तरी आपण पोदी शाळेमध्ये घेऊन आपला दुसरा डोस मोफत घ्या असा सामाजिक बांधिलकी जपणारा संदेश आल्याने पहिला डोस घेतलेले शेकडो नागरिक सुखावले. त्यांनी शाळेकडे धाव घेऊन सोमवारी दुसरा डोस घेऊन लसीकरण पूर्णत्वास नेले. या आरोग्य शिबिरास कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, अॅड.मनोज भुजबळ, अध्यक्ष राकेश भुजबळ, पनवेल भाजपाचे सचिव प्रशांत फुलपगार मंडळाचे कार्यकर्ते जयेश ठाकूर, रवींद्र फुलपगार, किशोर शिंदे, क्रांती चितळे, यतीन पाटील आधी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# मोटारसायकलीसह रिक्षा चोरी करणाऱ्या तिघांना गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाने घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटारसायकलीसह रिक्षा चोरी करणाऱ्या तिघांना गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाने ताब्यात घेतले आहे. यांच्या अटकेने

नवी मुंबई आयुक्तालय हद्दीतील घडणा-या विविध गुन्ह्यांची ऊकल करण्याबाबत माननीय अप्पर पोलीस आयुक्त महेश धुर्ये गुन्हे, मा.पोलीस उप आयुक्त प्रविण पाटील गुन्हे यांच्या सुचना व आदेश असून सहायक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट कक्ष ३ शत्रुघ्न माळी वपोनि यांचे सुचनानुसार हद्दीमध्ये गुन्हे घडू नये याकरिता प्रतिबंधक गस्त सुरु असताना आज दि. ०३/०९/२०२१ रोजी तळोजा व खारघर परिसरामध्ये कक्षाकडील स.पो.नि खरोटे, स.पो.नि.पवार व अंमलदार नामे पोहवा कोळी, पोना जोशी, पोना मोरे, पोना फुलकर यांना पापडीचा पाडा ते तळोजा जेल या रस्त्यावर तीन इसम संशयितरित्या विना नंबर प्लेटचे मोटार सायकलवरुन फिरताना दिसून आले. पोलीस पथकाने त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करता ते पळून जावू लागल्याने पोलीस पथकाने त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. सदर संशयीत नामे विधिसंघर्षग्रस्त १७ वर्षे ०६ महिने रा. धानसरगाव, ता. पनवेल, जि. रायगड, आकाश हिरामण तोंडे वय २० वर्षे, रा. रांजणपाडा, सेक्टर २७, राम मंदिराचे बाजूला, खारघर, नवी मुंबई मुळ रा. विठ्ठलनगर, टाटा पावर हाऊस, भिरा, ता. माणगाव, जि. रायगड, फरहान दाऊद शेख रा. ओवेकॅम्प, घर नं. १०९६, खारघर, नवी मुंबई यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करता विधीसंघर्षग्रस्त बालक याने त्याचे पालकांसमक्ष चालवित असलेली मोटार सायकल दिड वर्षापूर्वी खारघर येथून तर एक रिक्षा एन आर आय सागरी पोलीस ठाणे येथून चोरी केली असल्याबाबत गुन्ह्यांची कबुली दिली आहे. नमूद विधिसंघर्षग्रस्त बालक यांच्याकडून खालील नमुद गुन्हयातील सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून उघडकीस आलेले गुन्हे. खारघर भादवि कलम ३७९ प्रमाणे.(मोटारसायकल), एन आर आय सागरी पोलीस ठाणे गु.र.नं. २१०/२०२१ भादंवि कलम ३७९ प्रमाणे (ऑटो रिक्षा) वरील विधिसंघर्षग्रस्त बालक यांचे ताब्यातून एक बजाज कंपनीची सी टी १०० मोटार सायकल, एक काळया पिवळया रंगाची रिक्षा व संशयीतांकडील २ मोबाईल असा एकूण किंमत १,१४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. सदर विधिसंघर्षग्रस्त बालक व संशयीतांचा यांचा पूर्व इतिहास तपासला असता संशयितांवर वालिव पोलीस ठाणे गुरक्र १४५/२० व अर्नाळा पोलीस ठाणे गुरक्र ४७/२०२० अन्वये गुन्हे दाखल असून विधिसंघर्षग्रस्त बालक याच्यावर ही नवी मुंबई व ठाणे परिसरात गुन्हे दाखल असून नमूद सर्वांचे वर्तन गुन्हेगारी स्वरुपाचे आहे. वपोनि शत्रुघ्न माळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक ह्यांनी गुन्हे शाखा कक्ष-३ चा गेले आठवड्यात चार्ज घेताच खारघर, एनआरआयचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

# म्हसळा येथे शिक्षकदिना निमित्त, शिक्षक गुणगौरव कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

देशाचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षकदिन म्हणून म्हसळा तालुक्यातील सर्व शिक्षक संघटनांचे वतीने न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे किशोर मोहिते यांचे अध्यक्षतेखाली प्रचार्य मोरे पी.जी. शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुनील पवार, नरेश सावंत, नितिन माळीपरगे, सौ शुभदा दा- तार व म्हसळा तालुक्यातील सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

यावेळी शिक्षकदिना विषयी विविध वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर विविध प्रकारचे उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव करण्यात आला. यामध्ये अरविंद मोरे (रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार, रा. जि. प. शाळा -रेवली, पवन आडवळे (कोण बनेल करोडपती मध्ये उल्लेखनीय कामगिरी), परशुराम चव्हाण(अविष्कार फाउंडेशनच्या वतीने गुणवंत शिक्षक पुरस्कार) संतोष जंगम (आदर्श शिक्षकेतर कर्मचारी),कु.प्रणव नरळे( बाल कलाकार),तसेच सेवानिवृत्त झालेले अ.रऊफ मिरकर व सौ. स्नेहा सुनील उमरोटकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर सन्मानितांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये आपले गुरु आई, वडील, व शिक्षक यांचेकडून प्रेरणा घेवून आम्ही इथपर्यंत पोहोचलो. यानंतर आम्ही शिक्षण क्षेत्रात काम करताना शैक्षणिक प्रगत महाराष्ट्र , कोरोना, वादळ,अतिवृष्टी यामध्ये काम करताना आलेले अनुभव सांगितले तसेच आज तालुक्यातील सर्व शिक्षक संघटनांनी एकत्र येवून जो सत्कार केला याबाबत धन्यवाद दिले तदनंतर संघटनेचे अध्यक्ष नरेश सावंत, सुनील पवार, नितीन माळीपरगे तसेच मोरे पी. जी. यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर मोहिते यांनी आपल्या मनोगतात डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे विचार आपण आत्मसात केले पाहिजे, आज आपण एकत्र आलो याच प्रमाणे दरवर्षी ७ जानेवारी शिक्षक संघ वर्धापन दिन व ५ सप्टेंबर शिक्षक दिन या दिवशी तालुक्यातील सर्व शिक्षकांनी एकत्र येवून असाच कार्यक्रम घेवून या काळात सेवानिवृत्त शिक्षक, विशेष काम करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव केला जाईल.

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे आम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या वृंदावन को.ऑप.हौ.सोसायटीमधील A विंग २०३ हा फ्लॅट कै.अधिकराव नवलू शिंदे व कै.संदीप अधिकराव शिंदे यांच्या नावे फ्लॅट आहे. हे दोन्ही इसम मयत झाले असून त्यांचे वारस म्हणून श्रीमती.सुशिला अधिकराव शिंदे यांनी सोसायटीकडे सभासद होण्यासाठी भाग हस्तांतरसाठी व प्रॉपर्टीचा ताबा मिळविण्यासाठी अर्ज केला आहे. तरी याबाबत अन्य कोणी वारसदार यांचे सदरच्या प्रॉपर्टीवर कायदेशीर हक्क असल्यास योग्य त्या कागदपत्रासह सोसायटीच्या कार्यालयात अर्ज दाखल करावा. १५ दिवसांच्या आत असा अर्ज दाखल न आल्यास सोसायटी कै.अधिकराव नवलू शिंदे व कै.संदीप अधिकराव शिंदे यांच्या प्रॉपर्टीचा ताबा त्यांचे वारसाच्या ताब्यात देण्यात येईल. त्यानंतर कोणतीही तक्रार ऐकून / विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अध्यक्ष/सचिव**
**वृंदावन कॉम्प्लेक्स को.ऑप.हौ. सोसायटी मर्या.**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आ.प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासकामांचा झंझावात

जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पनवेल पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते नाथा आगलावे, कृष्णा पाटील, प्रकाश खैरे, दुंदरे ग्रामपंचायतीच्या सरपंच अनुराधा वाघमारे, माजी सरपंच नरेश पाटील, माजी उपसरपंच रमेश पाटील, सरपंच वाकडी ग्रापंचायतीच्या सरपंच कुंदा पवार, भाजपनेते संतोष पाटील, माजी उपसरपंच अरुण पाटील, जनार्दन पाटील, नामदेव जमदाडे, शत्रृघ्न उसाटकर, धनंजय पाटील, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण उलवेकर, गोवींद म्हात्रे, बुधाजी मोरावकर, अविनाश उलवेकर, दिपक उलवेकर, प्रमोद भोपी, अशोक उलवेकर, श्रीपद म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## लॅपटॉप चोरी करणारे राजस्थान मधील दोघे गजाआड

पैकी ज्या लॅपटॉपला बीप पिन लावलेली नसेल असे लॅपटॉप तेथील कर्मचाऱ्यांची नजर चुकवुन ते चोरी करून शोरुमधुन परागंदा होत असत. सदर आरोपींचा राजस्थान, दिल्ली या परिसरात गुन्हे शाखा, कक्ष २ , कडुन शोध घेण्यात आला. पंरतु नमुद गुन्हेगार हे अतिशय कावेबाज असल्याने ते वेगवेगळ्या ठिकाणी स्वतःचे अस्तित्व लपवुन गुन्हे करीत असत. नमुद गुन्ह्यातील आरोपी हे लॅपटॉप विक्री करण्यासाठी वाशी रेल्वे स्टेशन परिसरात येणार असल्याची माहीती गुन्हे शाखा, कक्ष २ चे पोलीस उप निरीक्षक मानसिंग पाटील यांना मिळाली. सदर ठिकाणी जावुन सापळा लावला असता नमुद गुन्ह्यातील दोन आरोपी हे मिळुन आले. सदर आरोपीविरुद्ध पनवेल शहर पोलिसठाण्यात गुन्हा दाखल अटक करण्यात आली त्यांच्याकडून सुमारे १२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वहाळ येथे विकास कामांचा धडाका

केले आहे. तसेच परिसरामध्ये रोगराई पसरू नये म्हणून घंटागाडी देखील खरेदी केली आहे त्यामध्ये सुखा कचरा,ओला कचरा असे वर्गीकरणसह कॅरियर बसवलेले आहेत. वहाळ ग्रामपंचायत करत असलेले कार्य पाहून एका खासगी कंपनीने आमच्याशी संपर्क साधला व त्यांच्या कंपनीच्या सीएसआर फंडातील रक्कम योग्य ग्रामपंचायतीला द्यावयाची असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांनी स्वच्छ पिण्याचे पाण्याची पाणपोई आणि अल्प विश्रांती केंद्र कार्यान्वित करून दिले आहे.

या कार्यक्रमाला आस्वाद पाटील, रायगड जिल्हा परिषद सदस्य रवींद्र पाटील, शेकापचे माजी तालुका चिटणीस नारायण शेठ घरत, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, रोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक महेंद्र पोटफोडे, सरपंच पूजा समीर पाटील, उपसरपंच अमर म्हात्रे, अमित घरत, तंटा मुक्ती समिती अध्यक्ष सिताराम नाईक मदन रमाकांत घरत, माजी सरपंच अरुण घरत,चेतन घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

## पेण खोपोली मार्गावर मोकाट गुरांचा ठिय्या ; वाहन चालकांत संताप

मोकळी न सोडता त्यांची योग्यप्रकारे निगा राखावी अशी मागणी प्रवाशी व वाहनचालकांमधून जोर धरत आहे.

भररस्त्यात ही गुरे ठाण मांडून बसत असल्याने वाहतुक कोंडीची समस्या देखिल निर्माण होताना दिसत आहे. तर रात्रीच्या वेळी मोटारसायकलस्वार व वाहनचालकांना रस्त्यात बसलेली गुरे दिसत नसल्याने अनेकदा अपघाताच्या घटना घडल्या आहेत. तसेच अवजड वाहनांच्या धडकेत गुरांचा बळी जाण्याची देखिल दाट शक्यता असते. मोकाट गुरांचे मालक व शेतकरी गुरांचा वापर करून काम झाल्यावर बेफिफिकरपणे वागत आहेत. त्यामुळे पेण खोपोली मार्गावर मोकाट गुरांची समस्या गंभीर झाली आहे.

## विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केली विसर्जन घाटांची पाहणी

याठिकाणी जर कुठे काही कमी पडत असले तर यासाठी विरोधी पक्षातील नगरसेवक पुढे येतील असे सांगण्यात आले. गणपतीच्या सणामध्ये नियमावलीचे पालन करण्याचे आवाहन प्रीतम म्हात्रे यांनी केलं आहे. पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी विसर्जन घाटाची पाहणी करून तिसऱ्या लाटेच्या अनुषंगाने पालिकेच्या अधिकाऱ्यांना महत्वाच्या सूचना करून खबरदारीच्या उपाययोजना करण्यास सांगितले. त्यामध्ये ६४ विसर्जन घाटातील विसर्जन करणाऱ्या व तैनात करणाऱ्या स्वयंसेवक, स्वच्छता कर्मचारी आणि आरोग्य सेवक यांची दोन ते तीन दिवस अगोदर आरटीपीआर टेस्ट करावी आणि विसर्जनाच्या दिवशी अँटीजेन टेस्ट करून घ्यावी तेव्हाच त्यांची नेमणूक तिथे करण्यात यावी. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने देखील गणेश भक्तांची नोंद करून आरोग्य तपासणी करावी. वेळ पडल्यास तिथे अँटीजेन टेस्ट करावी, आरोग्य टीम प्रत्येक विसर्जन स्थळी पूर्णवेळ तैनात करावे, अग्निशामक दल, रुग्णवाहिका, यांची देखील व्यवस्था करावी अशा महत्वाच्या सूचना विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केल्या आहेत.

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळण्यिात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत कब्जेदार सदरी नाव असलेल्या मिळकतीचे मालक / कब्जेदार १) नितीन गजानन म्हात्रे, २) वैशाली गजानन म्हात्रे यांच्याशी चर्चा करून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार आमचे अशिल करणार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड**

| गाव | सर्व्हे नं./ गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| जासई | २ | १ | ०-०५-५०<br>पो.ख.०-००-८०<br>एकूण ०-०६-३० | १.१९ |
| जासई | २ | ३ | ०-०२-३०<br>पो.ख.०-००-५०<br>एकूण ०-०२-८० | ०.३४ |

तरी वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कोणताही गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूली वाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत माझे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून खात्री करून घ्यावी. उपरोक्त पंधरा दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अॅड.अश्विन मोकल**
**गाळा नं.६, गुरुवाटीका,**
**ठाणा नाका रोड, पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९९३०१८३२४४**

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given to the public at large that my client has lost/misplaced the 'Original Share Certificate' of Flat bearing No. C- 1002, 10th Floor, admeasuring area about- 663.89 Sq. ft. Carpet, in the building known as 'HARD ROCK' Co-Operative Housing Society Limited, at Plots No. 6, 7, 8, 9 & 10, Sector- 07, Kharghar, Navi Mumbai, Taluka- Panvel, District- Raigad, Pin- 410210, comprising of 05 fully paid–up shares each, bearing distinctive numbered from 581 to 585 (Both inclusive) of Rs. 50/- (Rupees- fifty only) each, issued by the said society under share certificate no. 117, dated- dated- 01/05/2011, in the name of 1) MRS. SIMA NIKHIL ROY and 2) MR. NIKHIL ROY) has been lost.

It is humbl request If any person /s found the said Share Certificate please returne it to my office address or my clients residence address given above within 7 dyas from the date of publication hereof, otherwise the application for duplicate share certificate have to move to the said society by my client. My office address given herein below.

Place : Kharghar, Navi Mumbai,
Date : 06-09-2021

**Sd/-**
**Adv. Yogendra L. Dubey**
**(Advocate High Court)**
**Office no. 06, Phenix Residency,**
**Plot No. 64, Sector-20, Behing**
**Vishwajyot High School, Kharghar,**
**Navi Mumbai, Pin- 410210.**

अर्जदाराचे वकील
अॅड.अक्षय सुरेश भोईर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.एनं.८११/२०२१
नि.नं.७/ड

श्री.श्रीकांत सुरेश पाटील
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती
रा.२३९, कृष्ण मंदिराजवळ,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड ... सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. शामा शंभू पाटील तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड यांचा मृत्यू दि.१८/०२/१९५६ रोजी झालेला आहे. परंतु मृत्यूची नोंद पनवेल महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू नोंदणी पुस्तिकेत मृत्यूची नोंद केलेली नाही. तरी ती करून मिळावी याकरिता अर्जदार यांनी उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळावा यासाठी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

आज तारीख २७/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक न्याय.प्र.वर्ग, पनवेल | (कोर्टाचा शिक्का) | सही/- सहा.अधिक्षक न्याय.प्र.वर्ग, पनवेल

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस व संबंधित इसमांस माझे अशिल १) श्री.मधुकर दामोदर झेमसे, २) श्री.हरिश्चंद्र दामोदर झेमसे ३) श्रीमती.स्वाती गणेश क्षिरसागर ४) श्रीमती.बिमल लक्ष्मीकांत झेमसे व ५) श्री.तुषार लक्ष्मीकांत झेमसे यांचेतर्फे या जाहीर नोटीसीद्वारे सुचित व सावधान करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकत ही सामाईकरित्या त्यांचे मालकीहक्कात व ताबेकब्जात आहे. सदर मिळकतीबाबत माझे अशिल व कै.लक्ष्मीकांत दामोदर झेमसे यांनी खाली परिशिष्टात नमूद मिळकतीसंदर्भात तद्नुषंगिक कामे करण्याकरिता श्री.संतोष हिरामण अडसुळे यांना दि.०९/१०/२०१२ रोजीचे नोटराईज कुलमुखत्यारपत्र दिले होते. सदर दस्त हा नोटरी ऑफिसर अॅड.श्री.जितेंद्र डी.म्हात्रे यांचे कार्यालयात नोंदणी अनु क्र.७९३/२०१२ कडे नोंदविलेला आहे.

कै.लक्ष्मीदास दामोदर झेमसे यांचा दि.१३/१०/२०१३ रोजीच मृत्यू झाला आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतरच सदर नोटराईज कुलमुखत्यारपत्र हे त्यांचे हिश्श्यापुरते रद्द झाले आहे असे समजावे. तसेच सदरचा नोटराइज कुलमुखत्यारपत्राचा दस्त हा माझे अशिल रद्द करीत असलेमुळे त्या दस्ताच्या आधारे खाली नमूद मिळकतीबाबत श्री.संतोष हिरामण अडसुळे यांचेसमवेत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये तसेच सदरचे कुलमुखत्यारपत्र हे रद्द असलेबाबतची माहिती तमाम जनतेस असावी याबाबत ही नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

श्री.संतोष हिरामण अडसुळे, सौ.अश्विनी संतोष अडसुळे, श्री.योगेश म्हात्रे, श्री.सतीश बबन बोडके, तसेच नोटरी ऑफिसर अॅड.राकेश गुप्ता यांनी आपसात संगनमत करून माझे अशिल यांचे खाली परिशिष्टात नमूद मिळकतीसंदर्भात अन्य बनावट कुलमुखत्यारपत्र केले असल्याचे माझे अशिलांना समजले आहे. तरीही सदर मिळकती संदर्भात त्या बनावट कुलमुखत्यारपत्राच्या आधारे देखील माझे अशिलांव्यतिरिक्त अन्य कोणाही इसमासमवेत कोणताही व्यवहार अथवा करार मदार करू नये.

**मिळकतीचे परिशिष्ट**
**मौजे : कर्नाळा (तारा), तालुका : पनवेल, जि.रायगड**
**येथील बिनशेती जमीन**
**सर्व्हे नं.३२/१ क, एकूण क्षेत्र ५७.६ गुंठे**

तरी सर्व जनतेस व तमाम लोकांस या नोटीसीद्वारे आमचे अशिल कळवू इच्छितात की, वर नमूद केल्याप्रमाणे श्री.संतोष हिरामण अडसुळे यांचा सदर मिळकतीशी काही एक संबंध उरत नाही याची सर्व कल्पना लोकांस या नोटीसीद्वारे आमचे अशिल देत असून श्री.संतोष हिरामण अडसुळे यांचेबरोबर सदर मिळकती संदर्भात यापुढे कोणत्याही प्रकारचे व्यवहार व करार-मदार करू नयेत व केल्यास त्यांनी त्यांचे जबाबदारीवर केले आहेत असे आमचे अशिल समजतील व असे व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व संबंधितांनी सक्त ताकीद घ्यावी.

दि.०७/०९/२०२१

**सही/-**
**श्री.प्रदीप पाटोळे**
**वकील**
**पत्ता : गंगा यमुना अपार्टमेंट,**
**प्लॉट नं.बी-११०, रुम**
**नं.१०१, सेक्टर २३, सीवुडस,**
**नेरुळ, नवी मुंबई-४००७०६**

**म्हसळा नगर पंचायत, म्हसळा**
**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्या प्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

जा.क्र.म्हनप/जाहीर नोटीस/१२१७ /२०२१ दिनांक :- ०६/०९/२०२१

| अ.क्रं | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक / मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | १३६ | नवानगर | कौलारु चिखल मातीत बांधलेले घर | मर्यमबी महामुद उभारे | नजीर अहमद महामुद उभारे<br>इरशाद महामुद उभारे |
| २ | २ | ५५६ पैकी | म्हसळा बाजारपेठ | कमर्शियल / आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला गाळा नं. ६ अ | भास्कर रामजी गाणेकर | गणेश सुरेश नाक्ती |
| ३ | ३ | ८६२ पैकी | कन्याशाळा परिसर | ॐ साई दर्शन अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत इमारत तळ मजला फ्लॅट नं. ४ | बाबु नथुराम शिंदे<br>सायली बाबु शिंदे | निरज बाबु शिंदे, प्राजक्ता हेमंत पवार<br>प्रज्ञा बाबु शिंदे, पूजा बाबु शिंदे<br>मेघना बाबु शिंदे |
| ४ | २ | २९ | कुंभारवाडा | कौलारु चिखल मातीत बांधलेले प्लास्टर केलेले घर | अबुसईद अमानुल्ला चोगले | उदयकुमार दत्तात्रय कळस<br>समीर गोपीनाथ दिवेकर |
| ५ | ३ | १४२६ | काझी मोहल्ला | आर. सी. सी. पद्धतीत इमारत | बशीर आहमद काझी महामुद म्हसलाई | फैमिदा बशीर काझी, साजीद बशीर काझी, मेहमुद बशीर काझी, सलीम बशीर काझी, समिना ऐजाज पंचुलकर, मुनिरा नईम हासपाटेल |
| ६ | २ | १९५६ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | सल सबील फेस २ B विंग कमर्शियल आर.सी.सी. पद्धतीत तळ मजला गाळा नं. ७ | रियाज हाजिमिया घराडे | मुनिरा मन्सुर सालदुलकर |
| ७ | २ | २०१४ पैकी | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०२ | दिलशाद अब्दुल सत्तार पेणकर | झरिना सलमान मोमीन |
| ८ | ३ | ५९७ | सावर बौद्धवाडी | कौलारु चिखल मातीत बांधलेले घर | धर्मीबाई पूतलाजी जाधव | संजय अर्जुन जाधव |
| ९ | २ | १७९६ पैकी | दिघीरोड | आर.सी.सी. पद्धतीत इमारत स्टील प्लॅन पहिला मजला फ्लॅट नं. १०७ | सना खिजर अहमद | फकी इम्तियाज इस्माईल अहमद |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शिक्षक दिनी पालीत शिक्षकांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**

**पाली/बेणसे** : शिक्षक हा भावी पिढीचा शिल्पकार असून त्यांच्याकडून आपल्याला ज्ञान व जगाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी मिळत असते. या आपले गुरू शिक्षकां विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे पालीत शिक्षक दिन उत्साहात साजरा करून शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

पुरस्काराने प्रेरणा मिळते , प्रेरणेने राष्ट्र घडते, त्यामुळे या सन्मानाने शिक्षकांना प्रेरणा व प्रोत्साहन दिले. राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या सुचनेप्रमाणे रायगड जिल्हा महिला अध्यक्षा गीता पालरेचा यांच्या मार्गदर्शनाखाली सुधागड तालुका महिला राष्ट्रवादी काँग्रेसकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

## के.एन.एफ.सी फुटबॉल लीग स्पर्धेचा प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते शुभारंभ




**दै.रायगड नगरी । पनवेल**

के.एन.एफ.सी च्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित के.एन.एफ.सी फुटबॉल लीग स्पर्धेचे केक कापून शुभारंभ करण्यात आले. जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने सर्व खेळाडूंना फुटबॉल किट वाटप करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, के.एन.एफ.सी चे अध्यक्ष सलीम खान, सोहेल खत्री (संतोष ट्रॉफी प्लेअर महाराष्ट्र कप्तान), मनोज देढीया, प्रशिक्षक अक्षय साष्टे, सहकारी मंगेश अपराज, दर्शन कर्डीले, प्रदीप शेलार तसेच खेळाडू व त्यांचे पालक उपस्थित होते.

# मंगळागौर स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; हिरकणी ग्रुपने मारली बाजी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सतत कामात व्यस्त असलेल्या महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि दोन घटका करमणूक व्हावी यासाठी भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा पनवेल तालुका व शहर मंडलच्या वतीने रविवारी (दि. ५) मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष माधवी नाईक आणि चित्रा वाघ यांची उपस्थिती लाभली. या स्पर्धेत महिलांनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यामध्ये हिरकणी ग्रुपने प्रथम क्रमांक पटकाविला.



पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण प्रदेश उपाध्यक्ष ॲड. माधवी नाईक यांच्या हस्ते झाले. या वेळी महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, अर्चना परेश ठाकूर, मृणाल खेडकर, माजी नगराध्यक्ष प्राची मुकादम, स्मिता वाणी, माजी जि. प. सदस्य प्रिया मुकादम, पनवेल महापालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर, प्रभाग समिती सभापती सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, राजेश्री वावेकर, रूचिता लोंढे, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, सुहासिनी शिवणेकर, खांदा कॉलनी अध्यक्ष राखी पिंपळे, तालुका सरचिटणीस लीना पाटील, प्रतिभा भोईर, उपाध्यक्ष समिना साठी, अनुसया घरत, योगिता भगत, चिटणीस शिल्पा म्हात्रे, शहर सरचिटणीस नीता माळी, सरचिटणीस सपना पाटील, उपाध्यक्ष सुहासिनी केकाणे, स्नेहल खरे, अंजली इनामदार, कोषाध्यक्ष आदिती मराठे, सदस्य ज्योती देशमाने, मयूरी उन्नडकर, मनीषा बहिरा, नीता मंजुळे, इंदुमती म्हात्रे, अक्षया चितळे, सारिका म्हात्रे, श्वेता खैरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्या, स्पर्धक महिला उपस्थित होत्या.

मंगळागौर स्पर्धेत हिरकणी ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावला असून, त्यांना पाच हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या स्वच्छंद सामाजिक विकास संस्था या ग्रुपला तीन हजार रुपये आणि सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक पटकावलेल्या तळ्यात मळ्यात ग्रुपला दोन हजार रुपये आणि सन्मामचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

नंदादेवी ग्रुप आणि जय अंबा भवानी ग्रुपला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले, तर शीला चिंतामणी टिळक यांना विषेश सहभाग म्हणून सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण अनघा तांबोळी, प्रा. हेमाली शेडगे आणि मयूरी शिंदे यांनी केले.

> कोरोना काळात सगळ्यात पहिली कोरोना वॉरियर्स असेल तर प्रत्येक घरातील महिला. तिने दिवसभर राबत कुटुंबीयांना खाऊपिऊ घातले आणि काळजीही घेतली. त्यामुळे या आरोग्यलक्ष्मीला वंदन केले पाहिजे.
>
> **-चित्रा वाघ, प्रदेश उपाध्यक्ष, भाजप महिला मोर्चा**

> मंगळागौर स्पर्धा आयोजित करून महिलांना संधी दिल्याबद्दल भाजप महिला मोर्चा पनवेल तालुका व शहर मंडलचे कौतुक आणि या स्पर्धेत सहभाग घेऊन आपले कलागुण सादर केल्याबद्दल स्पर्धक महिलांना धन्यवाद.
>
> **-माधवी नाईक, प्रदेश उपाध्यक्ष, भाजप महिला मोर्चा**

# को.म.सा.प.शाखा तळा वतीने मितल वावेकर गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

**तळा** : माजी राष्ट्रपती शिक्षण महर्षी सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर जन्म दिनी म्हणजेच जागतिक शिक्षक दिनी कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळाचे वतीने प्राथमिक मराठी शाळा बेलघर/तळाघर येथील शिक्षिका मितल सुहास वावेकर यांना गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



जेष्ठ साहित्यिक तथा पत्रकार अं.वि. जंगम सर, अध्यक्ष हेमंत बारटक्के, कार्याध्यक्ष संदीप जामकर, सचिव विजय पवार, संस्थापक तथा जेष्ठ पत्रकार पुरूषोत्तम मुळे व पदाधिकारी, सदस्य यांच्या उपस्थित सन्मानीत करण्यात आले. यावेळी शिक्षक संघटना अध्यक्ष विजय येलवे, अमिश भौड, राजू थिटेकर, कल्याणी वाजे, गहिनीनाथ उस्तुरे घुटूकडे सर उपस्थित होते. मितल (मुळे) वावेकर या एम ए बीएड उच्च पदवीधर असून गेली २० वर्षे प्राथमिक शिक्षिका कार्यरत आहेत. विद्यार्थी हेच माझे दैवत समजून सेवा बजावत आहेत.

शैक्षणीक सांस्कृतिक, क्रिडा, क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून विद्यार्थी घडवले. प्रभावी अध्यापन संस्कृत भाषा आवडीचा विषय, उत्कृष्ट सुत्र संचालन, वाचन, लेखन स्वतःसह विद्यार्थ्यांना घडवीत असल्याने त्यांच्या अशा प्रामाणिक शिक्षकांमुळे ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा निश्चितच वाढत आहे. अशा गुणवंत शिक्षकेला पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या गुणवंत शिक्षिकेचा सोनार समाजाकडून शिक्षक वर्गातूनसर्व स्तरावर कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# ढोलकीतून घुमू लागलंय गणेशोत्सवाचा नाद

**दै.रायगड नगरी । पेण**

हिंदूंचे सण खऱ्या अर्थाने श्रावण महिन्यात सुरू होत असतात. श्रावण महिन्यात विविध प्रकारच्या सणांसह खऱ्या अर्थाने लगबग सुरू होते ती गणेशोत्सवाची. गणेशोत्सव हा कोकणातील महत्वाचा सण संबोधला जात असल्याने या सणाची तयारी आणि खरेदी ही काही दिवस आधीच गणेशभक्त करीत असतात. त्यामुळे व्यावसायिक देखील गणेशभक्तांना लागणाऱ्या विविध प्रकारच्या वस्तू बाजारात विक्रीसाठी ठेऊन सज्ज झाले आहेत. त्यातीलच गणेशोत्सवासाठी लागणारी ढोलकी ही एक महत्वाची बाब आहे. गणेशोत्सव मधील ढोलकीची मागणी लक्षात घेता पेण शहरात उत्तरप्रदेश मधील ढोलकी विक्रेते विक्री साठी दाखल झाले आहेत.

पेण शहर हे गणेश मूर्तीसाठी प्रसिद्ध असल्याने शहरातील जवळपास ७० टक्के व्यावसायिकांचे गणपती कारखाने आहेत, आणि हे कारखाने ज्याप्रमाणे आहेत त्याप्रमाणेच जवळपास ९० टक्के गणेशभक्तांच्या घरामध्ये गणपती बाप्पा विराजमान होत असतो. त्यामुळे बाप्पाची पूजा अर्चा करताना ज्याप्रमाणे टाळ महत्वाचे असतात, त्याप्रमाणे आरती म्हणताना लागणारी ढोलकी आता पेणच्या बाजारपेठेत विराजमान झाली आहे.

गणेशोत्सव चार दिवसांवर आला आहे. ढोलकी विक्रेते शहरामध्ये गल्लोगल्ली जाऊन आपल्या गणेशभक्तांसाठी ढोलकी विक्रीचा व्यवसाय करत आहेत. त्यामुळे आतापासूनच पेणमध्ये ठिकठिकाणी ढोलकीचा नाद घुमू लागला आहे. पेणमध्ये डेरेदाखल झालेल्या या ढोलक्या ढोलकी विक्रेते उत्तर प्रदेश हुन आणून येथे आपला व्यवसाय करत आहेत. साधारणपणे छोट्या ढोलक्यांपासून मोठ्या ढोलक्यांपर्यंत १०० रुपयांपासून ते ३०० – ७०० रुपयांपर्यंत या ढोलक्या विकल्या जात आहेत.

# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज तसेच राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या समाधीचे घेतले दर्शन

## तळीये गावाच्या पुनर्वसन कामाचा घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी काल (दि.०५ सप्टेंबर) रोजी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज तसेच पाचाड येथील राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्याचप्रमाणे त्यांनी या भेटीदरम्यान रायगड विकास प्राधिकरण अंतर्गत केल्या जाणाऱ्या कामांची माहिती घेतली. यावेळी महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, महाड तहसिलदार सुरेश काशिद, रायगड विकास प्राधिकरण कार्यकारी अभियंता विश्वनाथ सातपुते, रायगड रोप वे चे संचालक श्री.जोग हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी तळीये येथील पुनर्वसनाच्या जागेची तसेच तिथे दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधांची पाहणी केली. यासंबंधी सर्व कामांचा आढावा घेवून संबंधित अधिकाऱ्यांना तळीये येथील बाधित लोकांचे तात्पुरते पुनर्वसन त्वरित करण्याबाबत सूचना दिल्या.





यावेळी महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, महाड तहसिलदार सुरेश काशिद, एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.खाडे, तळीयेचे सरपंच संपत तांदलेकर,सभापती पंचायत समिती श्रीमती सपना मालुसरे, जिल्हा परिषद सदस्य श्री.मनोज काळीजकर, जिल्हा परिषद बांधकाम उपअभियंता श्री.देशमुख, तळीये मंडळाधिकारी, तलाठी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# नवीन पनवेल परिसरामध्ये घरफोडी प्रमाणामध्ये वाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल परिसरात चोरीचे प्रमाण खूप वाढलेले आहे. ४ सप्टेंबर रोजी रात्री बी १० मधील सर्व रहिवासी झोपलेले असताना रूमचे लॉक तोडून चोरांनी चोरी केली आहे. याची माहिती तेथील अध्यक्ष अनिल घरत व दक्ष नागरिक योगेश हांडगे यांनी स्थानिक नगरसेविका ॲडव्होकेट वृषाली वाघमारे यांना दिली. घरफोडीची माहिती मिळताच स्थानिक नगरसेविका वाघमारे व ॲडव्होकेट जितेंद्र वाघमारे यांनी खांदेश्वर पोलिस स्टेशन येथे जाऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांच्याशी वारंवार होणाऱ्या घरफोडी संदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंदर्भात सखोल चर्चा केली. तसेच पोलिसांची रात्रीच्या वेळेस गस्त वाढवण्याची मागणी केली.

---

श्रीमती.गोडसे मॅडम यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
ॲड.विक्रम पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.११७४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१४/१०/२०२१

श्री.मच्छिंद्र मारुती कदम, वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| | | एकूर गुंठा | हे.आर | |
| २५३ | ६/क | ०.२१.०० | ०.२१.०० | १.५७ |
| १०७ | १५/अ | ०.१६.० | | |

कै.मारुती दिनकर उर्फ दिनकरराव कदम हे दि.१३/०६/२०१७ रोजी मौजे : कोयनावेळे, घोट कॅम्प, तळोजा येथे मयत झाले. तसेच त्यांची आई कै.लक्ष्मी दिनकर उर्फ दिनकरराव कदम हे दि.११/०९/१९७७ रोजी मयत झाल्या असून, त्यांस अर्जदार क्र.१) श्री.मच्छिंद्र मारुती कदम अर्जदार क्र.२) सौ.माधुरी अनिल सावंत अर्जदार क्र.३) ग.भा.मिना मारुती कदम हे मुलगा, मुलगी व पत्नी असे तीन वारसदार आहेत.

अर्जदार यांनी कै.मारुती दिनकर उर्फ दिनकराव कदम यांच्या मृत्यूच्या पश्चात वारसदाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.६/९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मुजावर साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.विक्रम पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.११७३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१४/१०/२०२१

श्री.प्रमोद अनंत उर्फ अनंतराव कदम वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| | | एकूण गुंठा | हे.आर | |
| २५३ | ६/क | ०.२१.०० | ०.२१.०० | १.५७ |
| १०७ | १५/अ | ०.१६.० | | |

कै.अनंत उर्फ अनंतराव दिनकर उर्फ दिनकरराव कदम हे दि.११/०९/२०१९ रोजी मौजे : कोयनावेळे, घोट कॅम्प, तळोजा येथे मयत झाले. तसेच त्यांची आई कै.लक्ष्मी दिनकर उर्फ दिनकरराव कदम हे दि.११/०९/१९७७ रोजी मयत झाल्या असून त्यांस अर्जदार क्रं.१) श्री.प्रमोद अनंत उर्फ अनंतराव कदम, अर्जदार क्र.२) श्री.प्रवीण अनंत उर्फ अनंतराव कदम अर्जदार क्र.३) श्री.नंदकिशोर अनंत उर्फ अनंतराव कदम, अर्जदार क्र.४) सौ.सुप्रिया सुनील शिंदे व अर्जदार क्र.५) ग.भा.विजया अनंत उर्फ अनंतराव कदम हे मुलगे व मुलगी, पत्नी असे पाच वारसदार आहेत.

अर्जदार यांनी कै.अनंत उर्फ अनंतराव दिनकर उर्फ दिनकराव कदम यांच्या मृत्यूच्या पश्चात वारसदाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.६/९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मे.मुजावर साहेब

ॲड.प्रज्ञा उपाध्ये

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात
चौ.अर्ज नं.१११३/२०२१
नि.नं.८
ने.ता.२०/१०/२०२१

श्री.कृष्णा लक्ष्मणराव होनगेकर
वय सुमारे ८५ वर्षे, व्यवसाय : निवृत्त
रा.फ्लॅट नं.४०, बिल्डींग नं.बी ११,
केंद्रीय विहार को.ऑप.हौ.सोसायटी, सेक्टर ३८,
नेरुळ (प.), तालुका व जिल्हा : ठाणे, नवी मुंबई — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.किरण कृष्णराव होनगेकर
वय सुमारे ५७ वर्षे, व्यवसाय :
रा.फ्लॅट नं.३०२, प्लॉट नं.२०,
बाळक्रिष्ण अपार्टमेंट, सेक्टर ४४ ए,
नेरुळ (प.), तालुका व जिल्हा : ठाणे, नवी मुंबई
२) श्री.नितीन कृष्णराव होनगेकर
वय सुमारे ५५ वर्षे, व्यवसाय :
रा.फ्लॅट नं.ए–१०२, ओम निलकंठ अपाटमेंट,
प्लॉट नं.३१, सेक्टर ४२ ए, नेरुळ, ता.जि. ठाणे, नवी मुंबई
३) सौ.आरती सचिन बद्रे
वय सुमारे ४९ वर्षे, व्यवसाय : डॉक्टर
रा.फ्लॅट नं.४, सनराईस बिल्डींग,
वर्सोवा रोड, ७ बंगला, अंधेरी (प.), वर्सोवा मुंबई — सामनेवाला

ज्यापेक्षा अर्जदार यांची पत्नी मयत सुमन कृष्णराव होनगेकर, ह्या कोणतेही मृत्यूपत्र न करता दि.०५/०२/२०१९ रोजी फ्लॅट नं.ए–१०२, ओम निलकंठ अपार्टमेंट, प्लॉट नं.३१, सेक्टर ४२ ए, नेरुळ, तालुका व जिल्हा : ठाणे, नवी मुंबई ४००७०६ येथे मयत झाली आहे. मयत सुमन कृष्णराव होनगेकर यांच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतीचे सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे :–

All the piece of property known as Flat No.305, admeasuring about 43.69 sq.mtrs. of Built up area in the D wing in the " Rishikesh Co-operative Housing Society" building on Plot no.29, 30, 31 in Kamothe, Sector 34, Taluka Panvel, Dist. Raigad, having 1/2 share in the said property valued for Rs.3,17,370/-

मयत सुमन कृष्णराव होनगेकर, हिच्या वारसाबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशा लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.६ माहे ९, २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.भाकरे सो.कोर्ट

ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

दि.चौ.अर्ज नं.११४०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१०/२०२१

१) श्रीमती.पार्वती वामन खुटारकर
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.हेमंत वामन खुटारकर
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.विजय वामन खुटारकर
वय : ४३ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.संदीप वामन खुटारकर
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.विशाल वामन खुटारकर
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील कै.वामन शांताराम खुटारकर हे दि.२७/०५/२०२१ रोजी मौजे एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची आई कै.जानकीबाई शांताराम खुटारकर ह्या दि.२०/१०/२०१२ रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.वामन शांताराम खुटारकर यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | ९ | १७३ | ५ | ०–२८–६ |
| | | १६९ | ४ | ०–४२–० |
| | | ३ | ४ | ०–१६–८ |
| | | १६९ | ६ अ | ०–१८–० |
| | | १८५ | १ | ०–२०–१२ |
| | | १९९ | २ | ०–०–४ |
| | | १९७ | ० | ०–८–१२ |
| नावडे | | २०० | ९ | ०–१–० |
| नावडे | १०७ | ८७ | २ ब | ०–२७–० |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा कै.वामन शांताराम खुटारकर यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.वामन शांताराम खुटारकर यांचे वारसदार या नात्याने कै.वामन शांताराम खुटारकर यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या. व. स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.वामन शांताराम खुटारकर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ०६/०९/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

# तळा शहरात प्लॅस्टिक पिशव्या चोहीकडे

## शासन निर्णय अंमलबजावणीकडे नगरपंचायत प्रशासनाकडून दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा** : तळा शहरात सध्या चोहीकडे प्लॅस्टीक पिशव्या दिसत आहेत. या शहरात स्वच्छतेवर अधिक भर दिला जात असताना मात्र, प्लॅस्टीक पिशव्यांवर बंदी असताना शहर तसेच परिसरातील विक्रेते, व्यापाऱ्यांकडून प्लॅस्टीक पिशव्यांचा वापर सर्रास केला जात असून शहरात जिकडे-तिकडे चोहीकडे अशा पिशव्या पडलेल्या दिसतात. यामुळे शहरातील काही भागाला ओंगाळवाणे स्वरूप आले आहे.

राज्य शासनाने प्लॅस्टिक पिशव्या वापरावर बंदी घातलेली असताना तळा शहरातील बाजरापेठा तसेच दुकानांतून प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर सर्रास केला जात आहे. शहरातून गोळा होणाऱ्या कचऱ्यात प्लॅस्टिकचे प्रमाण ७० टक्क्यांपेक्षाही अधिक आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या निर्णयाचा तळ्यात बोजवारा उडाला आहे.



तळा शहरातून गोळा होणाऱ्या कचऱ्यामध्ये प्लॅस्टिकच्या कचऱ्याचे प्रमाण अधिक आहे; पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्लॅस्टिकच्या पिशव्यांवर शहरात सरसकट बंदी घालण्याचा आदेश राज्य शासनाने दि. २४ डिसेंबर २००९ मध्ये जारी केला आहे. या आदेशानंतर सुरवातीच्या काळात नगरपंचायत आरोग्य विभागाकडून कारवाई पथकही नेमण्यात आले होते. प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरणारे विक्रेते, व्यापारी यांच्यावर कारवाई करून दंड वसूल करण्यात येत होता. प्लॅस्टिकच्या पिशव्या वापर टाळावा, याकरिता सुरुवातीच्या काही महिन्यातच नगरपंचायतकडून नागरिकांमध्ये जनजागृती करण्याकरिता प्रयत्न झाले, त्यातून तळा शहर प्लॅस्टीक मुक्त झाले होते. परंतु, गेल्या काही वर्षांत प्लॅस्टीक बंदीबाबत कारवाईची तीव्रता कमी झाली आहे. गेल्या वर्षभरापासून ही कारवाई ठप्पच आहे.

### फौजदारी कारवाईची गरज

राज्य सरकारने केलेल्या कायद्यानुसार शहरात प्लॅस्टिकच्या पिशवी वापरल्यास १०० रुपयांपासून एक हजारांपर्यंत दंड वसूल केला जातो. या कारवाईत प्लॅस्टिकच्या पिशव्या जप्त करणे, दंडवसुली आणि खटले दाखल करण्याचा समावेश आहे. पण अद्यापपर्यंत नगरपंचायत प्रशासनाने एकाही प्लॅस्टिक पिशव्यांची विक्री करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध फौजदारी कारवाई केलेली नाही. आगामी काळात नगरपंचायतीने फौजदारी कारवाई केल्यास प्लॅस्टिकच्या पिशव्यांवरील बंदीची अंमलबजावणी होण्यास मदत होईल.

# संक्षिप्त...

## साडे चार लाख रूपयांच्या पाईपांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातील साडे चाल लाख रूपये किंमतीच्या पाईपांची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

सचिन चव्हाण (वय-३२) यांच्या कंपनीचे हॉरिझोंटल डायरेक्शनल ड्रिलींग मशिनवर लोखंडी पट्टीला कुलूप लावून पॅक केलेले जवळपास ५० लोखंडी पाईप ज्याची किंमत ४, ४८, ९९० रू. इतकी आहे. नौमानी मजिदजवळ पनवेल-मुंब्रा रोडलगत ठेवले असताना अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून सदर पाईप चोरल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## खांब येथे संत सेना महाराज पुण्यतिथी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

खांब नाभिक समाजा तर्फे ४ सप्टेंबर २०२१ रोजी श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी खांब विभाग रोहा तालुका उपाध्यक्ष दिलीप शंकर मोहिते, खांब विभागीय अध्यक्ष राहुल भास्कर मोहिते यांच्या अध्यक्षते खाली खांब निवास्थानी साजरी करण्यात आली.

यावेळी ह-भ-प बापू महाराजांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या प्रवचनात सेना महाराजांचे चरित्र प्रकट केले.

दिलीप मोहिते आणि राहुल मोहिते यांनी सर्व समाज बांधवांना संघटित होऊन सामाजिक विकास करण्याचे आवाहन केले.

## अज्ञात वाहनांच्या धडकेने मोटारसायकलस्वार जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात वाहनांच्या धडकेने मोटारसायकलस्वार जखमी झाल्याची घटना पनवेल जवळील जेएनपीटी ते पळस्पे राष्ट्रीय महामार्ग बंबाईपाडा येथे घडली आहे.

दत्तात्रय जगताप (वय-२८) हे त्यांच्या मोटारसायकलीवरून सदर मार्गाने जात असताना अज्ञात वाहनाने त्यांच्या गाडीस धडक दिल्याने झालेल्या अपघा-तात ते जखमी झाले आहेत.

सदर घटनेनंतर अज्ञात वाहनचालक गाडी घेऊन पसार झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# ग्रुप ग्रामपंचायत पारगावतर्फे मोफत लसीकरणाला उत्स्फुर्त प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पारगावच्या वतीने नुकताच मोफत लसीकरणाचा उपक्रम राबविण्यात आला होता. याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे.

यात १७२ कोव्हिशिल्डचे डोस त्यात लसीचा पहिला व दुसरा डोस देण्यात आला. वय वर्ष १८ व ४५ वरील व्यक्तींना डोस देण्यात आले. यावेळी सोशल डिस्टन्सिंग काटेकोरपणे पालन करण्यात आले. आधारकार्ड मार्फतच हे लसीकरण करण्यात आले. येथील सरपंच सौ. अहिल्या बाळाराम नाईक यांच्या प्रयत्नाने १७२ डोस उपलब्ध करून देण्यात आले. तसेच वैद्यकीय अधिकारी गव्हाण कोपरच्या डॉ. अस्मिता पाटील यांच्या माध्यमातून उपसरपंच अंजली कांबळे, मा. उपसरपंच मनोज दळवी, मा. उपसरपंच सुशिल तारेकर, सदस्य विश्वनाथ पाटील, विजय वाघे, निशा पाटील, बानुबाई म्हात्रे, सोनाली भोईर, शिल्पा नाईक, कल्पना तारेकर, सुनंद भोईटे, डॉ. भारती, ग्रामविकास अधिकारी मोरेश्वर मोकल, मा. उपसरपंच रत्नदिप पाटील, राहूल कांबळे, कर्मचारी प्रमोद म्हात्रे, सोनिका, देवळे, श्रीमती चंद्रभागा तारेकर आदींनी विशेष सहभाग घेतला होता. या उपक्रमाबाबत विशेष कौतुक करण्यात आले आहे.

## गणेशोत्सवानिमित्त फडके नाट्यगृहात मोफत पार्किंग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वास-ुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथील पार्किंग शिवसेनेच्या मागणीवरून गणपती उत्सवानिमित्त नागरिकांना मोफत देण्यात आली आहे.

पनवेल शहरात वाहतूक कोंडीने नागरिक बेजार झाले आहेत. त्यातच गणेशोत्सव सण तोंडावर आल्याने शहरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. यावर उपाय म्हणून फडके नाट्यगृह येथील पार्किंग नागरिकांना मोफत करण्याची मागणी शिवसेनेचे पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल आणि माजी उपसरपंच धनंजय पाटील यांनी पनवेलच्या आयुक्तांकडे केली होती.

त्यानुसार पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी गणपती उत्सवानिमित्त फडके नाट्यगृहातील पार्किंग नागरिकांना मोफत केली आहे.

## पोलादपूर तालुक्यात खोट्या नोटांचा शिरकाव

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : तालुक्यात गेल्या महिन्यापासून एकीकडे माणुसकीचा महापूर अतिवृष्टी आणि भूस्खलनाच्या पातळीवर लोटला असून अन्नधान्य व मदतीची अक्षरश: लयलूट सुरू असताना आगामी गणेशोत्सव आणि सणासुदीच्या काळामध्ये ग्राहकांकडून अनावधानाने खोट्या नोटा बाजारात शिरकाव करण्याची शक्यता असल्याची परिस्थिती लोहारे येथील मटनविक्रेत्याच्या गल्ल्यात अज्ञात ग्राहकाने दिलेली पाचशे रूपयांची खोटी नोट आढळल्याने उघडकीस आली आहे.

पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथील दीपक घोडके यांच्या मनपसंद मटन शॉपमध्ये दर रविवार, बुधवार आणि शुक्रवारी मटनशौकीनांची झुंबड असते. काल रविवारीदेखील अनेकांनी मटन खरेदी करण्यासाठी गर्दी केली असताना कोण्या अज्ञात ग्राहकाने मटन खरेदी करून दिलेली पाचशे रूपयाची नोट बनावट नोट असल्याचे रात्री दिवसभराचा गल्ला मोजताना निर्दशनास आले.

लोहारे येथील दीपक घोडके यांना आढळून आलेल्या पाचशे रूपयांच्या या बनावट नोटेमध्ये हिरव्या चमकत्या रंगाची रेषा असूनही वॉटरमार्क नाहीत. यामुळे त्यांनी सदरची नोट खोटी असून बनावट असल्याचे वाटल्याने पोलादपूर येथील बँक ऑफ इंडियामध्ये संपर्क साधून सदरची नोट खोटी असल्याची खातरजमा केली. नोटाबंदी काळामध्ये बनावट नोटांसंदर्भात ५०० आणि २००० रूपयांच्या नोटांबाबत केलेला दावा अशा घटना भविष्यात वाढल्यास फोल ठरण्याची शक्यता दिसून येत आहे.

# ४४ आदिवासी जोडपी अडकली विवाह बंधनात

## खोपोलीत पार पडला सहजसेवा फाऊंडेशनच्या वतीने अनोखा सामुदायिक विवाह सोहळा

**दै.रायगड नगरी । राज साळुंके**

**खोपोली** : गेली दीड वर्षे कोरोनाने घातलेल्या थैमाना मूळे जनजीवन विस्कळीत झाले आहे, व लग्नसोहळ्यावर शासनाने बंदी व बंधने त्यामुळे या काळात अनेकांचा उत्साह मावळला आहे. अनेकांची आर्थिक परिस्थिती बिघडल्याने विवाह सोहळ्याचे आदीवासी व ठाकूर समाज बांधवांना आयोजन करणे शक्य होत नसल्याने या समाज बांधवाची समस्या लक्षात घेत खोपोलीत सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे सहजसेवा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे यांनी ५ सप्टेंबर रोजी खोपोलीत ४४ आदिवासी जोडप्यांचे सामुदायिक विवाह सोहळा आयोजन



केल्याने आदिवासी बांधवाच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळाला. तर अनेक मान्यवरांनी या सोहळ्यास हजेरी लावली व वधूवरांना आशीर्वाद दिले.

कोरोनात उद्योगधंदे बंद पडल्याने अनेकांना रोजगारापासून वंचित रा-हावे लागल्याने बहुतांशी नागरिकांना आर्थिक चणचणीचा सामना करावा लागत असून याचा मोठा फटका आदिवासी व ठाकूर समाजाला बसल्याचे पाहायला मिळते आहे, आदिवासी व ठाकूर समाज बांधवाची समस्या लक्षात घेत खोपोलीतील सहजसेवा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शेखर जांभळे यांनी ५ सप्टेंबर रोजी खोपोलीत सामुदायिक ४४ जोडप्यांचा विवाह सोहळा पार पडला. या उपक्रमात आदिवासी बांधवाच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळाला. या सोहळ्यास खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, आमदार जयंत पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, नगराध्यक्षा सुमन औसारमल, वंदनाताई मोरे, खोपोली चे पोलीस निरीक्षक शिरीष पवार, खालापूरचे पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांच्यासह अनेक सर्व पक्षीय नेते, पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांनी भेट देत वधू वरांना आशिर्वाद दिले.

# पालीतील खड्ड्यांमुळे नागरिकांच्या संयमाचा बांध फुटला; खड्ड्यात केले वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत रस्त्यांची पुरती दुरवस्था झाली आहे. गावातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यावर ठिकठिकाणी भले मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखेर नागरिकांनी सोमवारी (ता.६) खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण केले. तसेच शिवसेनेने खड्डे भरण्यासाठी नगरपंचायत प्रशासकांना निवेदन दिले.

पादचारी व वाहनचालकांना या खड्ड्यांमधून मार्ग काढणे जिकरीचे झाले आहे. त्यामुळे ऐन सणासुदीच्या तोंडावर नागरिकांसह वाहनचालक पुरते त्रस्त झाले आहेत. असा पार्श्वभूमीवर प्रशासनाने जणू काही आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधल्याप्रमाणे या समस्येकडे दुर्लक्ष होत आहे. म्हणून हे आंदोलन नागरिकांना करावे लागले असे ग्रामस्थ ॲड. नरेश शिंदे यांनी सांगितले. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवात खराब रस्त्यामुळे भाविकांची व खरेदीसाठी पालीत येणाऱ्या नागरिकांची खूप गैरसोय होत आहे. पाली स्टेट बँक पासून गांधी चौक, महावीर मार्ग ते थेट गणेश मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. आगरआळी, सावंतआळी, रामआळी ते मधल्या आळी पर्यंतचा रस्ता, भोई आळी, मिनिडोअर स्टॅंड ते बसस्थानक पर्यंतच्या रस्त्याची भल्या मोठ्या खड्ड्यांनी अक्षरशः चाळण झाली आहे. त्याचबरोबर बल्लाळेश्वर नगर, धुंडीविनायक नगर व शिळोशी आणि मढाळी गावाकडे जाणारा रस्ता प्रचंड फुटला आहे. पावसाचे पाणी या खड्डयात साठल्याने वाहन चालकास खड्डयाचा अंदाज येत नाही. परिणामी वाहन जोरात खड्डयात आदळते. त्यामुळे पाणी व चिखल पादाऱ्यांच्या अंगावर उडते. खड्ड्यातील बारीक खडी पसरल्याने वाहने घसरतात. दुचाकीस्वारांना चालतांना कसरत करावी लागते. काही दिवसांपूर्वी एक शिक्षिका दुचाकीवरून खड्ड्यांत पडून जखमी झाली होती. पादचाऱ्यांना येथून मार्ग काढतांना अडचणी येतात. महिला व वृद्धांची तर खूपच गैरसोय होते. खड्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडी देखील होत आहे. प्रत्येकजण या खराब रस्त्याबद्दल संताप व्यक्त करत आहेत.




## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां./२२२१/२६८३/२०२१ दि.२/०९/२०२१

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १३ | फा.प्लॉट नं.४०२अ/३, सदनिका क्र.३०१, यशोकुंज तक्का, पनवेल | हरिश्चंद्र तुकाराम शेळके | प्रथमेश सत्यविजय पाटील |
| २ | १० | सिटी सर्व्हे क्र.१३८५ सी,१सी,बी, १बी सदनिका क्र.२०४, रामा पांडुरंग गोकुळ, पनवेल | शाम नामदेव ठाकरे | राहूल मिलींद जाधव, रोशनी पांडुरंग जाधव, लग्नानंतरचे नाव रोशनी राहूल जाधव |
| ३ | ७ | सिटी सर्व्हे क्र.३५१, सदनिका क्र.२ कोहिनूर अपार्टमेंट, पनवेल | आबिद कुरबान हुसेन दारुवाला | रशिद महेमुद शेख शाहिदा महेमुद शेख |
| ४ | १४ | सर्व्हे क्र.७९७/१, सदनिका क्र.ए ५०२ तुलसी सोनाटा, पनवेल | अनोपचंद कुंडलिया | रमेश शामराव गोरड, अंजली अर्जुन दोलतोडे उर्फ अंजली रमेश गोरड |
| ५ | १६ | फा.प्लॉट नं.४४८, सदनिका क्र.२०३ गंगा बिल्डींग, पनवेल | मे.मोराज बिल्डर वतीने मोहन गुरुनानी | रिनाकुमारी अजय कुमार अजय कुमार |
| ६ | ७ | सिटी सर्व्हे क्र.३५१, सदनिका क्र.१ कोहिनूर अपार्टमेंट, पनवेल | आबिद कुरबान हुसेन दारुवाला | समरीन रविश शेख, अबुजर ईब्राहीम दळवी, रविश महमूद शेख |
| ७ | १४ | सर्व्हे क्रमांक ४८३, ४८४, पनवेल सदनिका क्र.५०१, साईराज पॅराडाईज | सी.के.व्यंकटाचल्लम कलावती व्यंकटाचल्लम | मनोज भिमराव धकाते |
| ८ | ११ | फा.प्लॉट नं.९४/३ ते ७, सदनिका क्र.१०२ नील पार्क, पनवेल | मिलींद मधुसूदन मुजुमदार | भगवाल लक्ष्मण मोकल |
| ९ | ६ | सिटी सर्व्हे क्र.५९९,५९९/१,६००,६०१ सदनिका क्र.२०३, सदाशिव नं.२, पनवेल | आर.एस.सुर्यराव स्मिता सुनंदन कोल्हाटकर | सुप्रिया सुनील रानडे सुनील दत्तात्रेय रानडे |
| १० | १२ | अ.भु.क्र.१३४/१, सदनिका क्रं.१०१ दांडेकर हॉस्पिटलच्या बाजूला, पनवेल | कांतीभाई पुरुषोत्तम पटेल | राकेशकुमार कांतीभाई पटेल |
| ११ | ७ | फा.प्लॉट नं.२१४, २१५, २६, २१७ सदनिका क्र.डी ७०१, पार्क प्लाझा, पनवेल | मे.गुब्रीत्रा डेव्हलपर्स | अकबर एम.जोगीलकर यास्मिन अकबर जोगीलकर |
| १२ | ९ | प्रापॅर्टी क्र.८३८,८३८/१,८३८/२ब, पनवेल गाळा क्र.५, आदित्य श्रीराम | कांतीभाई पटेल | राकेशकुमार कांतीभाई पटेल |
| १३ | ८ | फा.प्लॉट नं.२७०/३ पैकी, सदनिका क्र.१०२, गुलीस्तान अपार्टमेंट, उरण रोड, पनवेल | एस तालिमसन प्रकाश भिवा कांबळे | गितांजली प्रकाश कांबळे, अजिंक्य प्रकाश कांबळे, अनुराधा प्रकाश कांबळे, वृषाली प्रकाश कांबळे |
| १४ | ७ | सिटी सर्व्हे क्र.१४७/१, १४७/ए, १६३/१ब, १६३/ब, सदनिका क्र.२०१, पारस अपार्टमेंट, पनवेल | तबस्सुमनिसा अब्दुल मुखतार शेख | मोहम्मद आसद बाकर देशमुख |
| १५ | ९ | फा.प्लॉट नं.४५८, ४५९, ४९५, ४९७, ४९८ सदनिका क्र.डी.२४, कल्पतरु तक्का, पनवेल | मेसर्स कल्पतरु शर्यन्स | संदीप भरत पाटील मिनाक्षी संदीप पाटील |
| १६ | ८ | फा.प्लॉट नं.२५७, सिटी सर्व्हे क्र.७९३,८११,८१२, सदनिका क्र. सी.४०४, महालक्ष्मी, पनवेल | रमेशकुमार पिराराम चौधरी व इतर १ | अशोक पुजांजी इंगळे बाळाराम अशोक इंगळे |
| १७ | ७ | सिटी सर्व्हे क्र.४४ ए, सदनिका क्र. एस२/१० नफिस सोसायटी, पनवेल | सलीम मोहम्मद हुसेन पेशिमाम | सुकैना मुर्तुझा पुजांनी |
| १८ | १६ | फा.प्लॉट नं.४४५, सदनिका क्र.६१२ सी विंग, नॅशनल रिजेन्सी, पनवेल | दिलीप दयाराम रसाळ व इतर १ | राकेश गजानन पाटील ऋतुजा रमेश पाटील |
| १९ | ९ | फा.प्लॉट नं.४९४, सदनिका क्र.बी ५०३ वसंत आलाप सोसायटी, पनवेल | विजय नामदेव माळी व इतर १ | अर्जुन धोंडू जाधव अर्चना अर्जुन जाधव |
| २० | ११ | फा.प्लॉट नं.५१, ५१ए, सदनिका क्र.बी ४०१ आकांक्षा अव्हेन्यु, पनवेल | नरसिंग नैनाजी चौधरी व इतर १ | कैलाश चिमण सोलंकी शितल कैलाश सोलंकी |
| २१ | १४ | सर्व्हे क्र.४७३/ए-१ ते ए-३, ४७८/१ ते ९ प्लॉट नं.१३,१४, सदनिका क्र.२०२, पनवेल | मेसर्स आदर्श सोसायटी | प्रवीण शनिवार पाटील |
| २२ | १५ | अ.भु.क्र.२४७, इमारत क्र.१ व २, पनवेल, पनवेल मनपाचे शॉपिंग सेंटर, गाळा क्र.७३ | मेसर्स गुरुमाऊली सु.सोसायटी | सुयश सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित तर्फे अध्यक्षा सौ.अश्विनी योगेश म्हात्रे उर्फ अश्विनी भालचंद्र ठोकळ |
| २३ | १५ | अ.भु.क्र.२४७, इमारत क्र.१ व २, पनवेल, पनवेल मनपाचे शॉपिंग सेंटर, गाळा क्र.१३२ | मेसर्स गुरुमाऊली सुशिक्षित बेरोजगार सह. संस्था मर्यादित | सुयश सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित तर्फे अध्यक्षा सौ.अश्विनी योगेश म्हात्रे उर्फ अश्विनी भालचंद्र ठोकळ |
| २४ | ९ | फा.प्लॉट नं.२०८/ए-३, सदनिका क्र.३ ए-०९, आशापुरी, एम.जी.रोड, पनवेल | मगनलाल कानजी पटेल सविताबेन मगनलाल पटेल | संदीप मगनलाल पटेल |
| २५ | ९ | फा.प्लॉट नं.२०८/ए-३, सदनिका क्र.३ ए-०८, आशापुरी, एम.जी.रोड, पनवेल | मगनलाल कानजी पटेल सविताबेन मगनलाल पटेल | संदीप मगनलाल पटेल |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा.आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**